दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

'पीएटी'ची डिसेंबर मध्ये

अहिल्यानगर: राज्यातील शाळांमध्ये भाषा, गणित आणि इंग्रजी या विषयांसाठी घेण्यात येणारी संकलित मूल्यमापन चाचणी क्रमांक एक आता डिसेंबर महिन्यात होणार आहे. यापूर्वी ही परीक्षा नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात होणार होती. मात्र, दिवाळीच्या दीर्घ सुट्टीनंतर लगेचच परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासाची उजळणी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार नाही, तसेच सुट्टीनंतर काही विद्यार्थी शाळेत उशिरा हजर झाल्यास ते परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता होती. आता ही परीक्षा 2, 3 आणि 5 डिसेंबर 2026 रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

आज वसुबारस



वसुबारस निमित्त मंगलमय शुभेच्छा!

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १९३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

भारताच्या ऊर्जा भविष्याला बळ देणारा पायाभूत सुविधांचा विस्तार

धुळे : 'एक देश, एक ग्रीड' ही संकल्पना म्हणजे देशातील विविध भागांना एका सक्षम आणि परस्परांशी जोडलेल्या वीज पारेषण जाळ्याच्या माध्यमातून जोडण्याची महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय संकल्पना आहे. देशाच्या वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रदेशांमध्ये विजेचे कार्यक्षमतेने वहन करणे आणि उपलब्ध वीजनिर्मितीचा अधिक प्रभावी वापर करणे, हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी कौशल्याइतकेच प्रशासकीय समन्वय, वेळेवर निर्णयप्रक्रिया आणि शासन यंत्रणा, पायाभूत सुविधा विकसित करणाऱ्या कंपन्या तसेच स्थानिक समुदाय यांच्यातील सहकार्यही महत्त्वाचे आहे.

बिल्डस्पेसकडून 265 कोटींचा प्रकल्प सादर

मुंबई : नवी मुंबईस्थित औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधा विकास प्लॅटफॉर्म असलेल्या बिल्डस्पेसने मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) भिवंडी येथे सहकार लॉजिस्टिक्स पार्क हा ४२ एकरांवर पसरलेला ग्रेड-ए+ वेअरहाऊसिंग प्रकल्प सादर केला आहे. विकास व्यवस्थापनाच्या (ईपीसी, मार्केटिंग आणि लीजिंग) एकमेव जबाबदारीअंतर्गत बिल्डस्पेस हा प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पात १३ लाख चौरस फूट भाडेतत्त्वावर देता येणारे क्षेत्र उपलब्ध होणार असून, त्यासाठी ₹२६५ कोटींची गुंतवणूक करण्यात येत आहे.

किया इंडियाकडून ऑक्टोबर 2026 मध्ये 33,462 युनिट्सची विक्री

नवी दिल्ली: किया इंडिया या देशातील आघाडीच्या मास-प्रीमियम ऑटोमेकर कंपनीने भारतातील बाजारपेठेत प्रवेश केल्यापासून ऑक्टोबर २०२६ मध्ये ३३,४६२ युनिट्सची आतापर्यंतची सर्वोच्च मासिक घाऊक विक्री नोंदवली आहे. ऑक्टोबर २०२५ मधील २९,५५६ युनिट्सच्या तुलनेत यात वार्षिक आधारावर १३.२२ टक्के वाढ झाली आहे. यासह कंपनीने सप्टेंबर २०२६ मध्ये प्रस्थापित केलेला ३२,०१७ युनिट्सच्या विक्रीचा आधीचा विक्रम मागे टाकत सलग दुसऱ्या महिन्यात आपली आतापर्यंतची सर्वोच्च मासिक विक्री साध्य केली आहे.किया इंडियाची एकूण एकत्रित घाऊक विक्री जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत २,८६,४७० युनिट्सवर पोहोचली आहे, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत २१.३१ टक्के वाढ झाली आहे.

वाशी इंटिग्रेटेड सोल्युशन्स तर्फे सोलर मार्ट सुरु

छत्रपती संभाजीनगर : भारतातील फास्ट-मूव्हिंग इन्स्टिट्यूशनल गुड्स (FMIG) क्षेत्रातील आघाडीच्या बी2बी खरेदी आणि पुरवठा सेवा भागीदारांपैकी एक असलेल्या वाशी इंटिग्रेटेड सोल्युशन्स लिमिटेडने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे नवीन सोलर मार्ट सुरू केला आहे. यामुळे कंपनीचे सौर ऊर्जा उत्पादनांच्या वितरणाचे नेटवर्क अधिक मजबूत होणार आहे. चिकलठाणा एमआयडीसी येथे सुमारे 4800 चौरस फुटांच्या जागेत हा सोलर मार्ट सुरू करण्यात आला आहे. या केंद्रामुळे स्थानिक सोलर इन्स्टॉलर्सना सौर ऊर्जेशी संबंधित उत्पादने लवकर उपलब्ध होतील.

पेट्रोल पंपाच्या मोजणीचा नकाशाच भूमी अभिलेख विभागाकडून रद्द!

आता BPCL च्या महाराष्ट्र पेट्रोलियम पंपाच्या परवानग्यांवर प्रश्नचिन्ह; महानगरपालिका, जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मौजे रावसपुरा, ता. छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रमांक १३/१ मधील महाराष्ट्र पेट्रोलियम (भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड – BPCL) च्या पेट्रोल पंपाचा वाद आता अधिक गंभीर वळणावर पोहोचला आहे. या पेट्रोल पंपाच्या जागेसंदर्भात भूमी अभिलेख विभागाने १९ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण आदेश देत यापूर्वी करण्यात आलेल्या मोजणीचा मोजणी आलेख रद्द केला आहे. त्यामुळे या मोजणीच्या आधारे मिळविण्यात आलेल्या विविध शासकीय परवानग्या आणि NOC यांच्या वैधतेबाबत नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. डॉ. शाजिया फरहीन कुरेशी यांनी दाखल केलेल्या हरकती अर्जावर सुनावणी व अभिलेखांची तपासणी केल्यानंतर उपअधीक्षक, भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांनी हा आदेश दिला आहे. आदेशानुसार ७ ऑक्टोबर २०२१ रोजी करण्यात आलेल्या संबंधित मोजणीचा आलेख रद्द करण्यात आला आहे.

***मोजणीच्या आधारे घेतलेल्या NOC ची चौकशी होणार का?* :**

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, याच मोजणीच्या आधारे पेट्रोल पंपासाठी विविध शासकीय विभागांकडून परवानग्या आणि ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यात आली. आता मूळ मोजणी आलेखच रद्द झाल्याने त्या आधारे सादर करण्यात आलेले नकाशे, जमीन हद्दी आणि परवानग्यांची वैधता संबंधित विभागांनी तपासणे आवश्यक आहे. सर्व NOC आणि परवानग्यांचा फेरआढावा घेण्याची मागणी करण्यात येत आहे.

***अग्निशमन विभागाच्या तपासणीत अग्निसुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न* :**

पेट्रोल पंपाच्या अग्निसुरक्षेबाबतही गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत. ८ ऑगस्ट २०२६ रोजी अग्निशमन विभागाने केलेल्या तपासणीत आवश्यक अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. त्यानंतर अग्निशमन विभागाने पत्र क्रमांक ४७२, दिनांक ११ ऑगस्ट २०२६ अन्वये अंतिम Fire NOC देण्यास नकार दिला. तसेच ३ सप्टेंबर २०२६ रोजी अग्निसुरक्षा उपाययोजना अपूर्ण असल्याबाबत नोटीस बजावण्यात आल्याचे सांगण्यात आले.

***Completion Certificate शिवाय पेट्रोल पंप सुरू केल्याचा आरोप* :**

महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी क्रमांक २६९/२०२२-२३ मधील अटींनुसार आवश्यक Plinth Completion Certificate, Completion Certificate/Occupancy Certificate आणि अंतिम Fire NOC बाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त न करताच पेट्रोल पंप सुरू करण्यात आल्याचा तक्रारदारांचा आरोप आहे.

***२,७८० चौरस फुटांच्या अतिक्रमणाचा आरोप; सहा वेगवेगळ्या नकाशांचा मुद्दा* :**

तक्रारदारांच्या आरोपानुसार, त्यांच्या मालकीच्या जमिनीतील सुमारे २,७८० चौरस फूट क्षेत्रावर पेट्रोल पंपाचा प्रवेशमार्ग आणि भूमिगत इंधन टाकीच्या संदर्भात अतिक्रमण झाले आहे. तसेच एकाच जागेसंदर्भात वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये सहा वेगवेगळे नकाशे सादर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत PWD आणि इतर संबंधित विभागांकडेही तक्रारी करण्यात आल्या आहेत.

***छावणी पोलीस ठाण्यात FIR; तरीही पुढील कारवाईची प्रतीक्षा* :**

या प्रकरणात छावणी पोलीस ठाण्यात FIR दाखल झाल्याचे तक्रारदारांनी सांगितले आहे. तसेच महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्त यांच्याकडेही विविध तक्रारी व निवेदने सादर करण्यात आली आहेत. मात्र, अद्याप पेट्रोल पंपाच्या सर्व परवानग्या, बांधकामाची वैधता आणि जमिनीच्या हद्दींबाबत एकत्रित ठोस कारवाई झालेली नसल्याची तक्रारदारांची भूमिका आहे.

***BPCL व्यवस्थापनाची जबाबदारी काय?* :**

भूमी अभिलेख विभागाचा मोजणी आलेख रद्द करण्याचा आदेश, अग्निशमन विभागाच्या आक्षेपांची नोंद, Completion Certificate बाबत उपस्थित झालेले प्रश्न, कथित अतिक्रमण आणि वेगवेगळ्या नकाशांचा वाद या सर्व बाबींची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. BPCL व्यवस्थापनानेही संबंधित परवानग्या कोणत्या नकाशांच्या आणि अभिलेखांच्या आधारे प्राप्त केल्या, याबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी होत आहे.

आता जनतेसमोर काही महत्त्वाचे उभे राहिले प्रश्न

१. मोजणी आलेख रद्द झाल्यानंतर संबंधित शासकीय परवानग्यांची फेरतपासणी कोण करणार?

२. महानगरपालिका आयुक्त पेट्रोल पंपाच्या बांधकाम परवानग्या व Completion Certificate बाबत चौकशी कधी करणार?

३. जिल्हाधिकारी जमीन, NA परवानगी आणि विविध NOC बाबत चौकशीचे आदेश कधी देणार?

४. पोलीस आयुक्त FIR आणि संबंधित तक्रारींच्या तपासात पुढील कारवाई कधी करणार?

५. BPCL व्यवस्थापन या सर्व गंभीर आक्षेपांवर काय भूमिका घेणार?

मोजणी आलेख रद्द झाल्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का? की नागरिकांना न्यायासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागणार? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

राज्याच्या आरोग्य सेवेत 1 हजार 440 डॉक्टर दाखल

नवनियुक्त डॉक्टरांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सेवाभाव आणि रुग्णसंवादाचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

मुंबई : राज्याच्या आरोग्य सेवेत १ हजार ४४० एमबीबीएस डॉक्टर दाखल झाले असून, आणखी ६२१ डॉक्टरांची भरती करण्यात येणार आहे. या भरतीमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागांतील आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहे. डॉक्टरांनी रुग्णांचा विश्वास जपून सेवाभावाने काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने १ हजार ४४० नवनियुक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्तिपत्रे वितरणाचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झाला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. नवनियुक्त डॉक्टरांमध्ये सुमारे ७०० महिला डॉक्टरांचा समावेश आहे. पारदर्शकपणे आणि गुणवत्तेच्या आधारे ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

डॉक्टर होणे ही पदवी असली, तरी डॉक्टर म्हणून समाजाचा विश्वास संपादन करणे हीच खरी कमाई आहे. प्रत्येक रुग्ण वेदना आणि चिंता घेऊन रुग्णालयात येतो. उपचारानंतर रुग्ण समाधानाने आणि आत्मविश्वासाने घरी परतणे, हेच डॉक्टरांच्या सेवेचे यश आहे. त्यामुळे नव्याने रुजू झालेल्या डॉक्टरांनी समर्पण, सेवाभाव, संवेदनशीलता आणि रुग्णसंवादाला प्राधान्य द्यावे, असे शिंदे म्हणाले.

नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी डॉक्टरांची पुरेशी



उपलब्धता आवश्यक आहे. डॉक्टरांना चांगले निवासस्थान, स्वच्छ व सुरक्षित परिसर, विरंगुळा आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. डॉक्टरांवरील कामाचा ताण लक्षात घेता, त्यांच्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

रुग्णालयांमध्ये उत्तम स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, पुरेसा औषधसाठा आणि सुसज्ज शस्त्रक्रियागृहे असली पाहिजेत. कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या वसतिगृहाचा तीन महिन्यांत कायापालट करण्यात आल्याचे सांगत राज्यातील डॉक्टरांच्या निवासव्यवस्थेतही आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

डॉक्टरांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांशी नियमित संवाद साधावा. आजार, उपचारपद्धती आणि रुग्णाच्या प्रकृतीबाबत स्पष्ट माहिती दिल्यास गैरसमज टाळता येतात. डॉक्टरांनी दिलेला विश्वास आणि मानसिक आधार रुग्णाच्या उपचारात महत्त्वाची भूमिका बजावतो. कोविड काळात डॉक्टरांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून केलेल्या सेवेचा उल्लेख करून शिंदे यांनी वैद्यकीय क्षेत्राच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आरोग्यविषयक निर्णय घेताना अनावश्यक प्रशासकीय विलंब टाळून गरजू रुग्णाला तातडीने उपचार मिळाले पाहिजेत, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. महाराष्ट्राचा आरोग्य विभाग देशात पहिल्या क्रमांकावर आणण्याची जबाबदारी डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची असल्याचे ते म्हणाले.

राज्यातील एकही प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालय डॉक्टरविना राहू नये, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने १ हजार ४०० डॉक्टरांची भरती केली असल्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. सुमारे १० हजार उमेदवारांमधून डॉक्टरांची निवड करण्यात आली आहे.

पुढील टप्प्यात आणखी ६०० डॉक्टरांची भरती, १ हजार ९०० समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची उपकेंद्रांमध्ये नियुक्ती आणि ३५० नवीन '१०८' रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १५ हजार कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात १२ डॉक्टरांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तिपत्रे देण्यात आली. यावेळी विधान परिषद उपसभापती सचिन अहीर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, कुपोषण टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत, खासदार संजय जाधव, खासदार धैर्यशील माने, आमदार मनीषा कायंदे, प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आयुक्त डॉ. संजय काटकर, शहरी आयुक्त डॉ. सुनील भोकरे, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, डॉ. विजय कंदेवाड आणि सहसंचालक नितीन भालेराव उपस्थित होते. प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांनी मनोगत व्यक्त केले, तर आयुक्त संजय काटकर यांनी प्रस्तावना मांडली.

लाड समितीच्या शिफारशीनुसार 39 सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेश



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या ३९ पात्र वारसांना लाड समितीच्या शिफारशीनुसार बुधवारी नियुक्ती आदेश वितरित करण्यात आले. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे सभागृहात सर्वसाधारण सभेदरम्यान हा कार्यक्रम झाला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार, सफाई कामगारांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, रुग्णता सेवानिवृत्ती तसेच मृत्यूनंतर त्यांच्या पात्र वारसांना लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देण्याची तरतूद आहे. या तरतुदीनुसार नियुक्तीसाठी प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांचे प्रस्ताव निवड समितीसमोर सादर करण्यात आले होते. ३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीत ३९ पात्र वारसांना नियुक्ती देण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार बुधवारी नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, इतर पदाधिकारी, सदस्य आणि महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले.

पाणी टंचाईतील थकित बिले तातडीने देण्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

मुंबई: राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना करण्यासाठी नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली 4 नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे घेण्यात आली. यावेळी राज्यातील पाणी टंचाई व पुरवठ्यासंदर्भात मागील दोन वर्षातील थकीत बिले आठ दिवसात देण्याचे निर्देश दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

"जीवनदाता परिवार सन्मान 2026" 28 नोव्हेंबर रोजी

मुंबई - आपल्या प्रिय व्यक्तीला गमावण्याचे दुःख शब्दांत व्यक्त करता येत नाही, परंतु दुःखाच्या या क्षणी घेतलेला एक निर्णय दुसऱ्या कुटुंबाला आनंद देऊ शकतो. अवयवदान हे असेच एक उदात्त कार्य आहे, ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीचे अवयव, मृत्यूनंतरही, गरजू लोकांना नवीन जीवन देऊ शकतात. या मानवतावादी भावनेचा आणि सेवेचा सन्मान करण्यासाठी, इंडिया २०३० २८ नोव्हेंबर रोजी जीवनदाता परिवार सन्मान २०२६ चे आयोजन करत आहे.

"शाल जोडे"



पदवीपेक्षा विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासावर भर द्या

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे विद्यापीठांना आवाहन; ६७ वा पदवीदान समारंभ साधेपणाने संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पदवीमुळे संधी मिळते; मात्र आपली क्षमता सिद्ध करावी लागते. राज्यातील विद्यापीठांनी केवळ पदवी अभ्यासक्रम राबविण्यापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासावर भर द्यावा. कौशल्य शिक्षण हा उच्च शिक्षणाचा अविभाज्य भाग बनला पाहिजे, असे आवाहन कुलपती तथा राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा पदवीदान समारंभ दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी साधेपणाने पार पडला. विद्यापीठाच्या नाट्यगृहात सकाळी साडेअकरा वाजता झालेल्या या समारंभाला मुंबई येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. विजय फुलारी, प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, लोकभवनचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कुलसचिव डॉ. संजय कवडे, परीक्षा मंडळ संचालक डॉ. बी. एन. डोळे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, अधिष्ठाता व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले, पदवीदान हा विद्यापीठाच्या जीवनातील प्रतिष्ठेचा क्षण आहे. पदवीधर हे ज्ञानाचे वाहक, मूल्यांचे वारसदार आणि भविष्याचे निर्माते आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव लाभलेल्या या विद्यापीठाची पदवी ही केवळ शैक्षणिक पात्रता नसून समाज आणि राष्ट्राप्रती जबाबदारीही आहे. विचार करणे, प्रश्न विचारणे, सतत शिकणे, मानवी प्रतिष्ठेचा आदर करणे आणि समाजासाठी योगदान देणे ही पदवीधरांची जबाबदारी आहे.

विद्यापीठांनी पदवी-केंद्रिततेकडून क्षमता-केंद्रिततेकडे वाटचाल करावी. बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, नवसंशोधन, कौशल्य विकास आणि संशोधनातून नवी शैक्षणिक संस्कृती विकसित करावी. मराठवाड्यातील विविध समस्यांच्या सोडवणुकीसाठी संशोधन व्हावे. प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांच्या पलीकडे जाऊन संशोधन समाजापर्यंत पोहोचले, तरच ते सामाजिकदृष्ट्या अर्थपूर्ण ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी स्वागतपर भाषणात विद्यापीठाने गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकी जपल्याचे सांगितले. शैक्षणिक संस्था व उद्योग क्षेत्रातील भागीदारी मजबूत करण्यासाठी मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर चेंबरच्या सहकार्याने तसेच ४० कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप आणि उद्योगाभिमुख शिक्षणाच्या संधी वाढविण्यात येत आहेत.गेल्या अडीच वर्षांत तीन रोजगार मेळावे व कॅम्पस भरती उपक्रमांत १३० कंपन्यांनी सहभाग घेतला. यात ६ हजार ४४० विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या, तर २ हजार ७६० विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, अशी माहिती डॉ. फुलारी यांनी दिली.

प्रमुख पाहुणे प्रा. अनिरुद्ध पंडित यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. रोजगार मागणाऱ्यांऐवजी रोजगार देणारे व्हा. नव्या संकल्पनांच्या आधारे उद्योग उभारा. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात नव्या संधींचा लाभ घ्या, असे ते म्हणाले. अपयशाला घाबरू नका, तर त्यातून शिकून स्वतःमध्ये सुधारणा करा. जिद्द, प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि सहानुभूती हीच यशाची खरी ताकद आहे. भारताच्या विकासात तरुणांची भूमिका महत्त्वाची असून जागतिक आव्हानांवरील उपायांसाठी जग भारतीय तरुणांकडे आशेने पाहत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यंदाच्या पदवीदान समारंभात ३३४ संशोधकांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये मानव्यविद्या शाखेतील १३१, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील १२४, वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्रातील ३१ आणि आंतरविद्याशाखेतील ४८ संशोधकांचा समावेश आहे.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ मधील १० हजार ३३१, मार्च-एप्रिल २०२६ मधील ५५ हजार २५५ विद्यार्थी आणि विद्यापीठ परिसरातील १ हजार ६३९ पदवीधारक अशा एकूण ६७ हजार ५५९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

प्रारंभी दीक्षांत मिरवणुकीने मान्यवरांचे सभागृहात आगमन झाले. राज्यपालांनी समारंभ सुरू झाल्याची घोषणा केली. प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांनी विद्यापीठाचा प्रगती अहवाल सादर केला. विविध विद्याशाखांतील पदव्यांचे वाचन अधिष्ठाता डॉ. भास्कर साठे, डॉ. सय्यद अझरुद्दीन, डॉ. धनश्री महाजन आणि डॉ. वैशाली खापर्डे यांनी केले. राज्यपाल वर्मा यांनी विद्यापीठ परिसरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. डॉ. मुस्तजिब खान आणि डॉ. गणेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

मुंबई महापालिकेला सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

मुंबईतील बोरिवली येथील बेस्ट बस स्थानकासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील अतिक्रमाणाचा प्रश्न आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन यावरून निर्माण झालेला पेच अखेर तात्पुरता निवळला आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे वेळेत पालन न केल्याने सर्वोच्च न्यायालयाने ३ नोव्हेंबर २०२६ रोजी कठोर भूमिका घेत मुंबई महानगरपालिका आयुक्तांना ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला होता, तसेच आयुक्त व त्यांच्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांचे नोव्हेंबर महिन्याचे वेतन रोखण्याचे निर्देश दिले होते. मात्र, महापालिकेने तातडीने हालचाली करत न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी केल्याची माहिती दिल्यानंतर, सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दंडाची व वेतन रोखण्याची 'कारणे दाखवा' नोटीस मागे घेत पालिका प्रशासनाला मोठा दिलासा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १३ नोव्हेंबर २०२५ आणि २८ जुलै २०२६ च्या आदेशांचे पालन करण्यासाठी पावले उचलल्याचे ज्येष्ठ अधिवक्ता आर. पी. भट यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने या निवेदनाची नोंद घेत आदेशांमधील दंडात्मक परिच्छेद मागे घेतले असले, तरी अंमलबजावणीच्या प्रत्यक्ष दर्जाबाबत कोणतेही अंतिम मत व्यक्त केलेले नाही. शिवाय, पालिका आयुक्तांना त्यांनी उचललेल्या पावलांचा संपूर्ण तपशील वैयक्तिक प्रतिज्ञापत्राद्वारे (Affidavit) पुढील सुनावणीपूर्वी सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, न्यायालयाने प्रशासनावरील आपली करडी नजर अद्याप हटवलेली नाही. सार्वजनिक वापरासाठी आणि वाहतूक व्यवस्थेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडांवर अतिक्रमणे होणे आणि ती हटवण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागणे, ही बाब महापालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. न्यायालयाने लावलेला चाबूक हा केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून, सरकारी यंत्रणांनी न्यायालयाच्या आदेशांची थट्टा करू नये, यासाठी दिलेला कडक इशारा होता. मुंबई पालिकेने या प्रकरणातून धडा घेऊन शहरात आरक्षित असलेल्या इतर सर्व भूखंडांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी आणि प्रशासकीय शिस्त पाळण्यासाठी कायमस्वरूपी तत्परता दाखवणे गरजेचे आहे.

हट्ट करणारे दिवस संपले... आता जबाबदाऱ्या निभावण्याची वेळ आली!

लहानपणी दिवाळी म्हटलं की डोळ्यांसमोर सर्वात आधी यायचे ते नवीन कपडे! दिवाळी जवळ आली की मनात एक वेगळीच उत्सुकता असायची. यंदा कोणते कपडे घ्यायचे, कोणता रंग निवडायचा, मित्रांनी घेतलेल्या कपड्यांपेक्षा आपले कपडे छान असावेत, असे कितीतरी विचार मनात सुरू असायचे. कधी आई-वडिलांकडे हट्ट करायचा, तर कधी आपल्या आवडीचे कपडे मिळेपर्यंत हट्ट सोडायचा नाही. त्या वेळी नवीन कपडे मिळणे, हाच दिवाळीचा सर्वात मोठा आनंद वाटायचा. बहुदा लहानपणी आजोळी दिवाळी व्हायची, आजी आणि आजोबांकडे कपड्यांसाठी हट्ट करायचा, त्यांच्यासोबत शहराच्या ठिकाणी कपडे घेण्यासाठी जाण्याचा देखील हट्ट असायचा.

काळ पुढे सरकत गेला. शिक्षण पूर्ण झाले, नोकरी लागली, स्वतःच्या पायावर उभे राहिलो. हातात स्वतः कमावलेला पैसा येऊ लागला. एकेकाळी कपड्यांसाठी हट्ट करणारे आपण आता स्वतःसाठी काही घ्यायचे म्हटले की, अनेकदा विचार करू लागलो. घरातील गरजा, आई-वडिलांच्या इच्छा, मुलांचे शिक्षण, कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आणि इतरांच्या आनंदासाठी खर्च करताना स्वतःच्या आवडी-निवडी कधी मागे पडल्या, हे समजलेच नाही.

पूर्वी दिवाळी आली की स्वतःसाठी काय घ्यायचे, याचा विचार असायचा. आता दिवाळी आली की घरातील प्रत्येकासाठी काय घ्यायचे, याचा विचार आधी मनात येतो. स्वतःसाठी एखादी वस्तू घ्यायची ठरवली तरी तिची गरज आहे का, हा प्रश्न आपणच स्वतःला विचारतो. कधी पैशांची अडचण नसते, पण स्वतःवर खर्च करण्याची सवयच कुठेतरी हरवलेली असते. याचा अर्थ असा नाही की, आयुष्यातील आनंद संपला आहे. उलट, इतरांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यात एक वेगळेच समाधान मिळू लागले आहे. आई-वडिलांच्या, पत्नीच्या चेहऱ्यावरचे समाधान, मुलांच्या डोळ्यांतील चमक आणि आपल्या माणसांच्या चेहऱ्यावरचे हसू हीच जणू आपली दिवाळी बनली आहे.

पण या सगळ्या प्रवासात एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते. आपण मोठे होत जातो, तसे आपल्या इच्छा कमी होत नाहीत; फक्त त्या व्यक्त करण्याची पद्धत बदलते. लहानपणी स्वतःच्या आनंदासाठी हट्ट करणारे आपण मोठेपणी इतरांच्या आनंदासाठी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवायला शिकतो. कधीतरी जुन्या दिवसांची आठवण झाली की मन नकळत बालपणात जाते. त्या नवीन कपड्यांचा हट्ट, फटाक्यांच्या आतिषबाजी, घरातील दिवाळीची लगबग, फराळाचा सुगंध आणि कोणत्याही मोठ्या जबाबदारीशिवाय साजरा केलेला तो आनंद पुन्हा अनुभवावासा वाटतो.

खरंच, आयुष्याचा हा प्रवास कधी झाला, कसा झाला, हे कळलंच नाही. काही वर्षांपर्यंत दिवाळीला नवीन कपड्यांसाठी हट्ट करणारे आपण आज स्वतः कमावूनही बहुदा स्वतःसाठी काहीच न घेता इतरांच्या आनंदात समाधान शोधू लागलो आहोत.

कारण वय वाढतं तेव्हा फक्त माणूस मोठा होत नाही, तर त्याच्या प्राधान्यक्रमांची जागाही बदलत जाते. आणि कदाचित यालाच मोठं होणं म्हणत असावेत!

लक्ष्मण ज्ञानोबा खटिंग
-जवळा (स.) ता. जि परभणी ह. मु. नांदेड
९९६०९१००६४

दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी शासन मच्छीमार बांधवांच्या पाठीशी; तलावांतील गाळ काढण्याची विशेष मोहीम राबविण्याचे नियोजन

मत्स्यबीज नुकसानीची भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न; मत्स्यव्यवसायाला पुन्हा उभारी देण्यासाठी शासनाचे नियोजन

अहिल्यानगर जिल्ह्यात यंदा निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा शेतीबरोबरच मत्स्यव्यवसायालाही मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यातील सर्व १४ तालुके ट्रिगर-१ अंतर्गत दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले असून, पाणीसाठ्यात झालेली घट, तलावांची खालावलेली पाणीपातळी आणि मत्स्यबीजाचे झालेले नुकसान यामुळे मच्छीमार बांधवांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. मात्र, या संकटाच्या काळात शासन शेतकरी आणि मच्छीमार बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, त्यांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजनांचे नियोजन करण्यात येत आहे. तलावांतील गाळ काढण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, मत्स्यबीजाच्या नुकसानीची भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य व्यवस्थापन आणि मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनांचा लाभ मच्छीमार बांधवांना पोहोचविण्यासाठी शासनाने भर दिला आहे.

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी नुकतीच अहिल्यानगर तालुक्यातील चिंचोडी पाटील आणि पारनेर तालुक्यातील मांड ओहोळ येथील तलावांची पाहणी करून मच्छीमार बांधवांशी संवाद साधला. तलावांमधील पाणीसाठ्याची सद्यःस्थिती जाणून घेतानाच त्यांनी मच्छीमारांच्या अडचणी, नुकसान आणि अपेक्षा समजून घेतल्या. या भेटीदरम्यान मच्छीमारांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन देतानाच तलावांतील गाळ काढण्याची विशेष मोहीम अहिल्यानगर जिल्ह्यातून सुरू करण्याच्या नियोजनावर त्यांनी भर दिला.

अतिवृष्टी आणि दुष्काळामुळे मच्छीमारांसमोर दुहेरी संकट

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील अतिवृष्टी आणि सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षातील दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यातील मच्छीमार बांधव दुहेरी संकटात सापडले आहेत. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि त्यानंतर निर्माण झालेल्या अवर्षणाच्या परिस्थितीचा मत्स्यव्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. विविध मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या ताब्यातील तलावांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने मत्स्यपालनासमोर गंभीर आव्हान निर्माण झाले आहे. परिणामी, मत्स्यबीज संचयन, माशांची वाढ आणि मत्स्योत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला असून, मच्छीमार संस्थांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

मच्छीमार बांधवांनी मंत्री नितेश राणे यांच्याशी संवाद साधताना सन २०२५-२६ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या संस्थांना भरपाई देण्याची मागणी केली. मत्स्यबीज संचयनासाठी केलेला खर्च तसेच माशांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ज्या तलावांमध्ये अद्याप काही प्रमाणात पाणीसाठा शिल्लक आहे, तो माशांच्या वाढीसाठी उपलब्ध राहावा आणि पाटबंधारे विभागाने तो राखीव ठेवण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

या मागण्यांची दखल घेत मंत्री श्री. राणे यांनी मच्छीमार बांधवांना धीर दिला. मत्स्यबीजाच्या नुकसानीची १०० टक्के भरपाई मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. मच्छीमारांनी खचून न जाता या संकटाचा सामना करावा. त्यांना मदत मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील ७८ टक्के तलाव दुष्काळाच्या प्रभावाखाली

अहिल्यानगर जिल्ह्यात पाटबंधारे विभागांतर्गत एकूण ७४ तलाव असून, त्यांचे एकूण जलक्षेत्र १० हजार ७२२ हेक्टर आहे. जिल्ह्यात ३ हजार ११६ मच्छीमार सभासद आहेत. दरवर्षी १४७ लाख मत्स्यबोटुकली संचयनाचे उद्दिष्ट असते, तर अपेक्षित मत्स्योत्पादन ७ हजार ६६८ मेट्रिक टन आहे. सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यात २ हजार ७२ मेट्रिक टन मत्स्योत्पादन झाले होते. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे सप्टेंबर २०२६ अखेर केवळ ४७९ मेट्रिक टन मत्स्योत्पादन झाले आहे. ही घट मत्स्यव्यवसायासमोरील आव्हानांची तीव्रता स्पष्ट करणारी आहे.

जिल्ह्यातील ७४ तलावांपैकी तब्बल ५८ तलाव दुष्काळग्रस्त परिस्थितीच्या प्रभावाखाली आहेत. म्हणजेच एकूण तलावांच्या तुलनेत हे प्रमाण सुमारे ७८ टक्के आहे. केवळ १६ तलावांमध्ये काही प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असून, हे प्रमाण २२ टक्के आहे.

पाटबंधारे विभागाच्या २२ सप्टेंबर २०२६ रोजीच्या पाणीपातळी अहवालानुसार जिल्ह्यातील बहुतांश तलावांची पाणीपातळी किमान मर्यादेपर्यंत पोहोचली आहे. यामध्ये ४५ तलावांमध्ये उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्के आहे. दोन तलावांमध्ये १ ते १० टक्के, चार तलावांमध्ये १० ते ३० टक्के, सहा तलावांमध्ये ३१ ते ५० टक्के, एका तलावामध्ये ५१ ते ७० टक्के, तर १६ तलावांमध्ये ७१ ते १०० टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे.

जिल्ह्यातील तलावांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे. अहिल्यानगर १०, कर्जत ९, जामखेड ११, पाथर्डी ७, पारनेर ११, राहुरी ३, श्रीगोंदा ८, श्रीरामपूर २, संगमनेर ९ आणि अकोले ४.

पाणीसाठ्यातील घट आणि मत्स्यबीजाचे नुकसान; उत्पादनावर परिणाम

तलावांमधील पाणीसाठा कमी झाल्यामुळे माशांच्या संगोपनावर अनेक प्रकारचे परिणाम होत आहेत. पाण्याची पातळी घटल्याने उपलब्ध पाण्यात माशांची घनता वाढते. त्यामुळे पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन माशांच्या मृत्यूचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होते. उष्णतेची तीव्रता आणि अपुरा पाणीसाठा यामुळे रोहू, कटला आणि मृगल यांसारख्या भारतीय माशांची वाढ खुंटते. परिणामी मत्स्योत्पादन आणि उत्पादकता घटते. पाण्यातील विरघळलेल्या प्राणवायूसाठी माशांमध्ये स्पर्धा निर्माण होते आणि त्याचा परिणाम त्यांच्या जगण्यावर होतो.

वेळेवर पाणी उपलब्ध न झाल्यामुळे मत्स्यबीज संचयनाच्या नियोजनातही अडथळे निर्माण होतात. अनेक तलावांमध्ये मत्स्यउत्पादन ठप्प झाले असून, मत्स्यबीजाचे संगोपन, प्रजनन आणि प्रजनक माशांवरही प्रतिकूल परिणाम झाला आहे. अपुऱ्या उत्पादनामुळे किंवा संपूर्ण मत्स्यपीक नष्ट झाल्यामुळे स्थानिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि अल्पभूधारक मत्स्यशेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

तलावांतील गाळ काढण्याची विशेष मोहीम अहिल्यानगरमधून

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तलावांतील गाळ काढण्याची विशेष मोहीम राबविण्याची गरज मंत्री नितेश राणे यांनी अधोरेखित केली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून राज्यातील तलावांतील गाळ काढण्याची विशेष मोहीम राबविण्याचे नियोजन आहे. या मोहिमेची सुरुवात अहिल्यानगर जिल्ह्यातून करण्याचे नियोजन करावे असेही मंत्री श्री. राणे म्हणाले.

तलावांतील गाळ काढल्यामुळे त्यांची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर काढलेला गाळ शेतीसाठी वापरल्यास जमिनीची सुपीकता वाढण्यास हातभार लागणार आहे. यामुळे जलसाठ्यांचे संवर्धन, शेतीला लाभ आणि मत्स्यव्यवसायाला चालना असे तिहेरी फायदे साध्य होऊ शकतात.

या मोहिमेचा सविस्तर आराखडा तयार करून कामांचे सूक्ष्म नियोजन करण्याची आवश्यकता आहे. तलावांतील गाळ काढण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, जेणेकरून आगामी काळात मच्छीमार संस्थांना मत्स्यपालनासाठी अधिक अनुकूल परिस्थिती उपलब्ध होईल, असे निर्देश मंत्री श्री. राणे यांनी दिले आहेत.

नुकसानभरपाईसाठी पंचनामे आणि अर्थसाहाय्याचे नियोजन

दुष्काळामुळे बाधित झालेल्या तलावांची पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. संबंधित मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांशी संपर्क साधून नुकसानीचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात येणार आहे.

५० टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा असलेल्या दुष्काळग्रस्त तलावांसाठी प्रति सभासद क्षेत्रफळाच्या निकषानुसार अर्थसाहाय्याची गणना करण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या अर्थसाहाय्याची मागणी मुख्यालयाकडे करण्यात आली आहे. तसेच ३ जुलै २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार अवर्षणामुळे मुदतवाढ देणे किंवा एनडीआरएफ/एसडीआरएफच्या निकषानुसार नुकसानभरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

याशिवाय, किती मत्स्यबीजाची आवश्यकता आहे, याची माहिती संकलित करून त्यानुसार मागणी निश्चित करण्याचे निर्देशही मंत्री श्री. राणे यांनी दिले आहेत. मत्स्यबीज संचयनासाठी योग्य नियोजन केल्यास आगामी काळात मत्स्यव्यवसायाला पुन्हा चालना देणे शक्य होणार आहे.

नाशिक विभागात मत्स्यव्यवसायाचे मोठे क्षेत्र

नाशिक विभागातीलपाटबंधारे जलाशयांच्या माध्यमातून मत्स्यव्यवसायाला मोठी संधी उपलब्ध आहे. विभागात एकूण ३१५ तलाव असून, त्यांचे एकूण जलक्षेत्र ५४ हजार २४७ हेक्टर आहे. विभागातील मच्छीमार लोकसंख्या १ लाख ४२ हजार असून, २८५ नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आहेत. या संस्थांचे एकूण सभासद २२ हजार ३३९ आहेत.

विभागात दरवर्षी ८ हजार ६२७ लाख मत्स्यबोटुकली संचयनाचे उद्दिष्ट असून, अपेक्षित मत्स्योत्पादन २५ हजार ६४६ मेट्रिक टन आहे. सन २०२५-२६ मध्ये विभागात प्रत्यक्ष २२ हजार ६०२ मेट्रिक टन मत्स्योत्पादन झाले होते. या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीत मत्स्यव्यवसायाचे नुकसान कमी करून त्याला पुन्हा उभारी देण्यासाठी विभागीय स्तरावर नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

शासकीय योजनांचा लाभ मच्छीमारांपर्यंत पोहोचविण्यावर भर

दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी आणि मच्छीमार बांधवांना दिलासा देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ मिळवून देणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना, मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना आणि किसान क्रेडिट कार्ड यांसारख्या योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे तसेच मच्छीमार बांधवांना किसान क्रेडिट कार्ड या योजनेचा लाभ मिळण्यासाठी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांना मच्छीमारांना जास्तीत जास्त लाभ घेता येईल या प्रमाणे प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत. या अनुषंगाने मत्स्यव्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त दिनेश धोपे यांनी नियोजन केलेले आहे.

संकटातून संधी निर्माण करण्यासाठी एकत्रित प्रयत्न

दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना पुरेशा ठरणार नाहीत, तर उपलब्ध जलसाठ्यांचे योग्य व्यवस्थापन, तलावांची पाणी साठवण क्षमता वाढविणे, मत्स्यबीजाचे नियोजन, नुकसानभरपाई आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या सर्व बाबी एकत्रितपणे राबविणे आवश्यक आहे. तलावांतील गाळ काढण्याची विशेष मोहीम, नुकसानग्रस्त संस्थांच्या नुकसानीचे पंचनामे, अर्थसाहाय्याची मागणी आणि मत्स्यबीजाची आवश्यकता निश्चित करण्याच्या माध्यमातून मच्छीमार बांधवांना दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या उपाययोजनांमुळे भविष्यात तलावांची पाणी साठवण क्षमता वाढण्याबरोबरच मत्स्यव्यवसायासाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

अतिवृष्टी आणि दुष्काळ अशा नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि मच्छीमार बांधवांना दिलासा देणे, त्यांचे आर्थिक नुकसान कमी करणे आणि त्यांचा व्यवसाय पुन्हा सक्षम करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. संकटाच्या या काळात शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, विभागीय समन्वयातून आणि नियोजनबद्ध उपाययोजनांतून मत्स्यव्यवसायाला पुन्हा उभारी देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जलसाठ्यांचे संवर्धन, मत्स्यव्यवसायाचे पुनरुज्जीवन आणि मच्छीमारांच्या आर्थिक स्थैर्याच्या दिशेने शासनाने उचललेली पावले निश्चितच दिलासादायक ठरणार आहेत.

मुकुंद लता मधुकरराव चिलवंत*
जिल्हा माहिती अधिकारी,
अहिल्यानगर*

कर्जमाफीचा शेतकऱ्यांना मोठा दिलासा; चौथ्या यादीत 34 हजार 754 शेतकऱ्यांना 368.84 कोटींचा लाभ

परभणी जिल्ह्यात आतापर्यंत 1 लाख 13 हजार 972 शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर 1 हजार 41 कोटी रुपये जमा

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी, : राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या योजनेच्या चौथ्या यादीतील ३४ हजार ७५४ पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर आज ३६८ कोटी ८४ लाख रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील आतापर्यंत चार याद्यांमधून एकूण १ लाख १३ हजार ९७२ पात्र शेतकऱ्यांना १ हजार ४१ कोटी ७५ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे.

महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेली आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीक कर्जे व पुनर्गठित किंवा फेरपुनर्गठित कर्जांपैकी पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येत आहे.

योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने तयार केलेल्या पोर्टलवर परभणी जिल्ह्यातील बँकांनी एकूण १ लाख ६० हजार ७६९ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. या माहितीच्या संगणकीय प्रक्रियेनंतर १ लाख ३६ हजार ८०९ पात्र शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणासाठी चार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या तीन याद्यांमधील आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ७९ हजार २१८ पात्र शेतकऱ्यांना ६७२ कोटी ९१ लाख रुपयांची कर्जमाफी वितरित करण्यात आली.. त्यानंतर आज, ४ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या चौथ्या यादीतील आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ३४ हजार ७५४ पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर ३६८ कोटी ८४ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

चार टप्प्यांतील कर्जमाफीचा तपशील पुढीलप्रमाणे :

१) ७ ऑगस्ट २०२६ – ७ हजार ८७० शेतकरी, ६०.०४ कोटी रुपये.

२) २४ ऑगस्ट २०२६ – ४४ हजार ७१३ शेतकरी, ३४८.०२ कोटी रुपये.

३) १ ऑक्टोबर २०२६ – २६ हजार ६३५ शेतकरी, २६४.८५ कोटी रुपये.

४) ४ नोव्हेंबर २०२६ – ३४ हजार ७५४ शेतकरी, ३६८.८४ कोटी रुपये.

अशा प्रकारे चारही टप्प्यांत मिळून १ लाख १३ हजार ९७२ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर एकूण १ लाख ४१ कोटी ७५ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) विकास जगदाळे यांनी दिली आहे

स्वदेशीचा संदेश देणारी सावरकरांची दिवाळी

या दिवाळीच्या निमित्ताने स्वदेशीचे प्रकाशपर्व आपल्या सर्वांच्या जीवनात नवी पहाट घेऊन येईल, हीच प्रार्थना!
— डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, बीड



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. रक्ताच्या थेंबाथेंबात असलेली देशभक्ती, अतुलनीय धैर्य, प्रज्ञा, प्रतिभा आणि बुद्धिवाद या गुणांच्या संगमाने त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले होते. देशातील सण, वार आणि उत्सवांबाबतही सावरकरांनी आपले विचार स्पष्टपणे मांडले होते.

आज देशभर 'स्वदेशी' आणि 'आत्मनिर्भरता' या संकल्पनांकडे विशेष लक्ष दिले जात आहे. पण सावरकरांनी यापूर्वीच स्वदेशीचा पुरस्कार केला होता. १९०५ साली पुण्यात युवकांसोबत विदेशी कपड्यांची होळी करून त्यांनी ब्रिटिश सत्तेला हादरा दिला; या प्रसंगाची नोंद ७ ऑक्टोबर १९०५ रोजीची आहे. नंतर १९२५ साली रत्नागिरीत 'दिपवाळीचें लक्ष्मीपूजन' ही कविता लिहून त्यांनी परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचा उपदेश केला. दिवाळीत विदेशी तेल, साबण, फटाके किंवा कपडे वापरू नका; त्यामुळे लक्ष्मी प्रसन्न होणार नाही, तर स्वदेशी वस्तूंचा वापर केल्यास लक्ष्मी आपल्या दारी येईल, असा त्यांचा संदेश होता.

स्वदेशीचे बीज

शालेय शिक्षणाच्या काळातच सावरकरांच्या मनात स्वातंत्र्यप्रेम आणि स्वदेशीची भावना रुजली होती. अवघ्या पंधरा वर्षांच्या वयात त्यांनी स्वदेशीचा जोरदार पुरस्कार करणारे विचार मांडले होते.

फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी मित्रपरिवारात स्वदेशी वस्तूंचा आग्रह धरला आणि स्वदेशीचा प्रचार केला. १ ऑक्टोबर १९०५ रोजी पुण्यातील एका सभेत त्यांनी परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. लोकमान्य टिळकांची परवानगी घेऊन ७ ऑक्टोबर १९०५ रोजी मिरवणूक काढून गाडाभर विदेशी कपड्यांची होळी केली गेली. या प्रसंगी सावरकरांनी केलेले भाषण त्यांच्या वक्तृत्वकौशल्याचे उत्तम उदाहरण होते; अगदी लोकमान्य टिळकही त्यांच्या भाषणाने प्रभावित झाले होते, असे इतिहास सांगतो. या आंदोलनामुळे महाविद्यालयाने सावरकरांना दहा रुपये दंड ठोठावला आणि वसतिगृहातून त्यांना काढून टाकले गेले. पण या शिक्षेमुळे त्यांचा स्वदेशीचा निश्चय अधिकच दृढ झाला.

रत्नागिरीतील कार्य

रत्नागिरीच्या वास्तव्यात सावरकरांनी भाषाशुद्धी आणि लिपीसुधारणेसोबतच स्वदेशीचाही पुरस्कार केला. रत्नागिरीत कोणत्या दुकानात स्वदेशी वस्तू उपलब्ध आहेत, याविषयी त्यांनी लेखही लिहिला होता.

स्वतः सावरकर रत्नागिरीत स्वदेशी वस्तूंची हातगाडी फिरवत. गावातील दुकानदारांनी आपल्या दुकानात स्वदेशी वस्तू ठेवाव्यात, यासाठी ते त्यांना भेटत आणि त्यांचे मनोबल वाढवत. स्वदेशी ही केवळ भाषणातली गोष्ट नव्हती; ती त्यांच्या व्यवहारात उतरलेली भावना होती.

'दिपवाळीचें लक्ष्मीपूजन'

'दिपवाळीचें लक्ष्मीपूजन' या कवितेत सावरकरांनी स्पष्ट केले की, परदेशी वस्तूंचा वापर करून लक्ष्मीपूजन केले तर लक्ष्मी प्रसन्न होणार नाही. परदेशी साबण अंगाला लावून, परदेशी सुताचे धोतर नेसून देव प्रसन्न होणार नाहीत, असे ते म्हणतात.

"हिंदुराष्ट्राच्या अखंडित परंपरेची नि सामायिक एकात्मतेची काही तरी यथावत् कल्पना हवी असेल तर हा दिवाळीचा एकच सण तरी पहा! दिवाळी हिंदुत्वाची एक सांकेतिक व्याख्या आहे!"
— स्वा. सावरकर

त्यांच्या मते, परदेशी वस्तू वापरणे म्हणजे आपल्या देशातील धन विदेशात पाठवणे होय. विदेशी वस्तू वापरून लक्ष्मीपूजन केले, तर लक्ष्मी रागावेल आणि कोट्यवधींचे धन विदेशात जाईल. त्यामुळे प्रत्येकाने लक्ष्मीपूजन करताना देशी वस्तूंचा वापर करावा, असा त्यांचा आग्रह होता.

कवितेतील संदेश स्पष्ट आहे—

देशी तेले, देशी साबू, देशी वस्त्राने,
देशी साखर, देशी अस्त्रे, देशी शस्त्राने,
स्वदेशलक्ष्मी पूजू साधुनि जरि मंगल वेळ,
गजांतलक्ष्मी हिंदुहिंदुच्या दारीं डोलेल!

या संपूर्ण कवितेतून सावरकरांनी विदेशी वस्तूंवर आणि फटाक्यांवर बहिष्कार घालण्याचा उपदेश केला आहे.

दिवाळीचे सामाजिक महत्त्व

दिवाळीबाबत सावरकरांनी लिहिले होते की, दिवाळी हा एक निर्मळ सामाजिक सण आहे. आपल्या निवृत्तिप्रधान राष्ट्राचा हा प्रवृत्तिप्रण आनंदोत्सव आहे. त्याचे सर्व संस्कार प्रेमळ, सभ्य, समाजसंघटक, श्रवण-नयनानंदक, आरोग्यदायी आणि सर्वस्वी निर्मळ आहेत. त्यांच्या दृष्टीने दिवाळी केवळ प्रसंग नव्हती; ती समाजाला एकत्र आणणारी, संस्कार देणारी आणि राष्ट्रभावना जागृत करणारी होती.

आजची प्रासंगिकता

सध्या चीनसारख्या शेजारी राष्ट्राच्या आर्थिक व सामरिक धोक्यामुळे देशभर चिनी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले जात आहे. अनेक संघटना यासाठी कार्यरत आहेत. या पार्श्वभूमीवर सावरकरांनी अनेक वर्षांपूर्वी सण-उत्सवांत देशी बनावटीच्या वस्तू वापराव्यात, असे आवाहन केले होते, हे अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांची ही दूरदृष्टी आजच्या 'आत्मनिर्भर भारत' आणि 'वोकल फॉर लोकल' या विचारांशी सुसंगत ठरते.

(लेखक सावरकर साहित्याचे अभ्यासक असून, ICSSR कडून मंजूर झालेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रकल्पावर संशोधन करत आहेत.)

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर
गुरूवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२६

एमजीएममध्ये यशवंत घारपुरे यांचा औद्योगिक व्यवस्थापनावर मास्टरक्लास

उद्योगातील कार्यक्षमता, आर्थिक नियोजन आणि विपणनाचे महत्त्व विशद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या वतीने 'इंडस्ट्रियल पॉलिक्लिनिक' या विषयावर ज्येष्ठ उद्योगतज्ज्ञ तथा हिंदुस्थान अँटिबायोटिक्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक यशवंत घारपुरे यांचा विशेष मास्टरक्लास विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात संपन्न झाला. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, सर्व अधिष्ठाता, संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते. मास्टरक्लासमध्ये यशवंत घारपुरे यांनी औद्योगिक व्यवस्थापन, उद्योगातील कार्यक्षमता, देखभाल व्यवस्थापन, विपणन, आर्थिक नियोजन आणि सल्लागार सेवांचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. औद्योगिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ उत्पादनावर लक्ष केंद्रित न करता व्यवस्थापनाच्या विविध पैलूंचा समन्वय साधणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

औद्योगिक व्यवस्थापनातील निर्णयप्रक्रियेवर भाष्य करताना त्यांनी नैसर्गिक न्यायाचे तत्त्व, निष्पक्ष व्यवहार आणि



पूर्वग्रहविरहित निर्णय यांचे महत्त्व स्पष्ट केले. कोण, का, काय, कसे, कोणत्या साधनांद्वारे आणि केव्हा या सहा मूलभूत प्रश्नांच्या आधारे प्रकल्पांचे प्रभावी नियोजन करता येते, असे त्यांनी नमूद केले. यंत्रसामग्रीची कार्यक्षमता टिकवणे, उत्पादनातील बंद कालावधी कमी करणे आणि उपकरणांचे आयुष्य वाढविणे यासाठी देखभाल व्यवस्थापन महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

विक्री आणि विपणन यांतील फरक स्पष्ट करताना विद्यमान मागणी पूर्ण करणे म्हणजे विक्री, तर ग्राहकांमध्ये नवीन मागणी निर्माण करून त्यांना समाधानकारक अनुभव देणे म्हणजे विपणन, असे त्यांनी सांगितले. याशिवाय ब्रेक-इव्हन विश्लेषण, उत्पादन खर्चाचे व्यवस्थापन, निर्यातीसाठी मार्जिनल कॉस्टिंग आणि विखुरलेल्या माहितीचे मूल्यवान संसाधनांमध्ये रूपांतर करण्यात ॲग्रीगेटर्सची भूमिका याविषयी त्यांनी उदाहरणांसह माहिती दिली.

यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ म्हणाले, घारपुरे सरांचे वय ९३ वर्षे असूनही ते स्वतः शिकत आहेत आणि इतरांना ज्ञानदान करीत आहेत, ही प्रेरणादायी बाब आहे. औद्योगिक प्रगतीत विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची असून, विद्यापीठांमधील संशोधनामुळे संबंधित भागाच्या विकासासह समाजातील सर्व घटकांना लाभ होतो, असे त्यांनी सांगितले.

गलवाडा (अ) जिल्हा परिषद शाळेत आकाशकंदील निर्मितीचा उपक्रम



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.४ नोव्हेंबर : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील गलवाडा (अ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी आकाशकंदील बनविण्याचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी रंगीबेरंगी व आकर्षक आकाशकंदील तयार करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमात श्रेया कांबळे, ईशानी सोनवणे, नियती बिऱ्हारे, आयशु बिऱ्हारे, खुशी घन आणि स्नेहल घन या विद्यार्थिनींनी सुंदर आकाशकंदील तयार केले. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता विकसित व्हावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि स्वावलंबनाची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

बस मध्ये चढताना सोन्याच्या गंठणाची चोरी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी** दिवाळीचा सण असल्यामुळे रेल्वे स्टेशन बस स्थानक येथे प्रवाशाचे खचाखच गर्दी होत असते हो त्या गर्दीचा फायदा घेऊन चोर आपला डाव साधण्याचा प्रयत्न करत असतो दिवाळीनिमित्त बस स्थानकावर प्रवाशाची गर्दी होत आहे त्याच गर्दीचा फायदा घेत चोरट्याने दोन वेगवेगळ्या घटना एकाच महिलेच्या सोन्याचे गंठण लंपास केले तर एक जनाचे पॉकेट चोरट्याने लांबविले ही घटना चार नोव्हेंबर बुधवार रोजी दुपारी पावणे दोन च्या सुमारास घडली पाथरी बुलढाणा बस क्रमांक M. H. 20 बी एल 40 85 या बस मध्ये लोणार ला जाण्यासाठी चढत असताना अश्विनी विठ्ठल पालवे यांच्या गळ्यातील एक तोळ्याचे सोन्याचे गंठण लंपास करण्यात आले आहे याच गर्दीचा फायदा घेत चोरट्याने शेख मकसूद या तरुणाच्या खिशातील तीन हजार रुपये असलेले पॉकेटही चोरले एकाच वेळी दोन प्रवाशांना चोरीचा फटका बसला या घटनेनंतर बस स्थानकात परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले बस मध्ये इतकी गर्दी होती की एकाच वेळेस दोन प्रवाशाचे चोरी झाली त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आणिअशातच बस स्थानक परिसरात पोलीस चौकी उभारण्यात आली आहे मात्र गेल्या आठ ते दहा दिवसापासून येतो की बंद असल्यामुळे व दिवाळीनिमित्त बस स्थानकात गर्दी होत असताना प्रवासाच्या सुरक्षेसाठी असलेली पोलीस चौकी बंद असल्याने चोरट्याने फायदा घेतला आहे आणि पोलीस चौकी तात्काळ सुरू करावी व चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

ही दिवाळी बळीराजाच्या घरी' उपक्रमाला ज्येष्ठ अभिनेत्री पुष्पा चौधरी यांचा प्रतिसाद

शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी पुढाकार; उपक्रमात सहभागी होऊन मदत करणार

हिंगोली : दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी आत्महत्यांमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्यासाठी सेवासदन परिवाराच्या वतीने 'ही दिवाळी बळीराजाच्या घरी' हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची माहिती मिळताच ज्येष्ठ अभिनेत्री पुष्पा चौधरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कार्यक्रमात सहभागी होऊन शेतकरी कुटुंबांना मदत करण्याची तयारी दर्शविली आहे.



दुष्काळामुळे अनेक शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून, शेतकरी आत्महत्यांमुळे अनेक कुटुंबांचा आधार हरपला आहे. अशा परिस्थितीत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे, निराधार कुटुंबे आणि दिव्यांग कुटुंबांना आधार देण्यासाठी सेवासदन परिवाराने यंदाची दिवाळी त्यांच्यासोबत साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत गरजू कुटुंबांना किराणा किट आणि साडी-चोळी सन्मानपूर्वक भेट देण्यात येणार आहे.

या उपक्रमाची माहिती मिळाल्यानंतर ज्येष्ठ अभिनेत्री पुष्पा चौधरी यांनी धनराज कदम यांच्याशी संपर्क साधून या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचे कळविले. शेतकरी कुटुंबांच्या या कठीण काळात आपण त्यांच्या पाठीशी असून, आपल्या परीने या कुटुंबांसाठी योगदान देण्याचा प्रयत्न करणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

निराधारांच्या घरात आनंदाचा दिवा पेटविण्याचा संकल्प

ज्या कुटुंबांना आर्थिक अडचणींमुळे दिवाळी साजरी करणे शक्य होत नाही, अशा कुटुंबांच्या घरात आनंद, प्रकाश, आधार आणि जिव्हाळ्याचा दिवा पेटविणे ही काळाची गरज आहे. एकमेकांना आधार देणे, संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणे आणि आपल्याकडील आनंद इतरांसोबत वाटून घेणे ही महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती आहे. याच भावनेतून सेवासदन परिवाराशी जोडलेल्या सदस्यांनी एकत्र येत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे.

६ नोव्हेंबर रोजी १०० कुटुंबांसोबत दिवाळी

येत्या ६ नोव्हेंबर रोजी शिवाजीराव देशमुख सभागृहात १०० गरजू कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करण्यात येणार आहे. यावेळी संबंधित कुटुंबांना किराणा किट आणि साडी-चोळी भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, प्रभारी पोलीस निरीक्षक कमलेश मीना, उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या सामाजिक उपक्रमाला अधिक व्यापक स्वरूप मिळावे आणि गरजू कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, यासाठी दानशूर व्यक्तींनी सढळ हाताने मदत करावी तसेच उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मीरा कदम आणि धनराज कदम यांनी केले आहे.

शाळा-महाविद्यालयांत 'सुरक्षित बचपण अभियान'द्वारे बालहक्क व संरक्षणाबाबत जनजागृती



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार राज्यात 'सुरक्षित बचपण अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांअंतर्गत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण)आर. एम. सादराणी, यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी व हिंगोली जिल्ह्यातील ६५ पेक्षा अधिक शाळा/कॉलेज/वस्तीगृह येथील विद्यार्थ्यांसाठी सदर अभियानांअंतर्गत विविध जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले.

या अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांना गुड टच बॅड टच, बालकांचे स्वसंरक्षण, बालकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम, तसेच बालकांच्या संरक्षणासाठी जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या विविध यंत्रणा व सेवा याबाबत विविध ठिकाणी वेगवेगळे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच बालकांनी कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराला बळी न पडता प्रसंगी धैर्याने त्याचा प्रतिकार करावा, तसेच अडचणीच्या प्रसंगी पालक, शिक्षक व संबंधित यंत्रणांची मदत घ्यावी. तसेच, बालकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, बालकांचे हक्क व संरक्षण याबाबत जागरूकता निर्माण करणे आणि बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध घालणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

तसेच या अभियानाअंतर्गत बालकांचे संरक्षण ही केवळ शासनाचीच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकांची सामुहिक जबाबदारी आहे. प्रत्येक बालकाला सुरक्षित, आनंदी व भयमुक्त बालपण मिळावे, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रत्यत्न करणे आवश्यक आहे. तसेच बालकांना काही अडचण आल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८, महिला हेल्पलाईन १८१, पोलीस हेल्पलाईन ११२ व कायद्येविषयक काही अडचण असल्यास १५१०० या सर्व हेल्पलाईन क्रमांकाचा अडचण आल्यास उपयोग करावा, असे आवाहन सचिव (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) तथा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) भूषण म. काळे, यांनी केले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनुराग सावे यांचा विवाह साधेपणाने

सावे-मुळे परिवाराकडून एक कोटींचा निधी समर्पित



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकरी बांधवांवरील संकटाची जाणीव ठेवत उद्योजक चि. अनुराग सावे यांचा विवाह सोहळा घरगुती स्वरूपात साधेपणाने करण्याचा निर्णय सावे आणि मुळे परिवाराने घेतला आहे. विवाह सोहळ्यावर होणाऱ्या खर्चात बचत करून, त्यात उद्योगातील निधीची भर घालत दोन्ही परिवारांनी शेतकरी बांधवांसाठी एक कोटी रुपयांचा निधी समर्पित केला आहे.

अनुराग सावे यांचा विवाह छत्रपती संभाजीनगर येथील प्रतिष्ठित उद्योजक श्री. अजित मुळे यांची कन्या चि.सौ.कां. ईशा हिच्याशी २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. विवाहानिमित्त परंपरेने संपर्कात असलेल्या हजारो लोकांना सहभागी करून मोठ्या सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, विशेषतः मराठवाड्यातील शेतकरी शेतीच्या नुकसानीमुळे कठीण परिस्थितीचा सामना करत असल्याने मोठा सोहळा साजरा करणे योग्य वाटले नाही.

स्व. मोरेश्वर सावे यांच्यापासून सावे परिवार सामाजिक कार्य आणि उद्योग क्षेत्रात अग्रेसर आहे. मुळे परिवारही उद्योग क्षेत्रात अग्रणी असून, दोन्ही परिवारांनी एकत्रितपणे हा संवेदनशील निर्णय घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी करत असलेल्या प्रयत्नांना हातभार लावण्याच्या उद्देशाने हा निधी समर्पित करण्यात आला आहे. अनुराग आणि ईशा यांच्या वैवाहिक जीवनाला शेतकरी बांधवांचे आशीर्वाद लाभावेत, हीच परिवाराची सदिच्छा आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन पूर्ववत सुरू करण्याबाबत शासन सकारात्मक

पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे बंद करण्यात आलेले निवृत्तिवेतन पूर्ववत सुरू करण्याबाबत शासन सकारात्मक असून, यासंदर्भातील प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे, असे पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली एमएसआरडीसी कार्यालय, निर्मल भवन येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपसचिव अनिल धस, वित्त विभागाच्या उपसचिव मनीषा कामटे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी गजानन गुरव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संघर्ष कृती समितीचे सरचिटणीस गजानन गटलेवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनासंदर्भात १६ मार्च २०१७ रोजी मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. त्यानुसार २३ मार्च २०१७ रोजी शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने निवृत्तिवेतनाचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन स्तरावर सकारात्मक कार्यवाही सुरू असल्याचे राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी स्पष्ट केले. सध्या १७४ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन प्रलंबित प्रकरणी मुख्यमंत्री कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून, मुख्यमंत्री कार्यालयाशी समन्वय साधून तसेच वित्त विभागाशी चर्चा करून हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

दीपावली विशेष पुस्तिकेचे विमोचन; 9 नोव्हेंबरला निर्वाण कल्याणक सोहळा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जैन धर्मात दीपावली हा भगवान महावीर स्वामी यांच्या निर्वाण कल्याणकाचा पवित्र महापर्व आहे. दीपावलीचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी परमपूज्य आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष दीपावली पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. आचार्य संघाच्या सान्निध्यात श्राविकांच्या हस्ते पुस्तिकेचे विमोचन झाले. यावेळी महावीर पाटणी, संतोष अजमेरा, महावीर ठोले, शिरीष पाटणी, प्रमोद काला, आनंद पाटणी, संजय काला, मनोज जैन यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून सहस्रनाम जप, १००८ कलशांनी अभिषेक, अर्घ्य समर्पण, विधान व हवन होणार आहे. ९ नोव्हेंबरला निर्वाण कल्याणकानिमित्त जैन मंदिरांत धार्मिक कार्यक्रम, निर्वाण लाडू अर्पण, विशेष पूजन व दीपार्चना होईल. समाजबांधवांनी सहकुटुंब सहभागी व्हावे, असे आवाहन खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत व श्री पार्श्वनाथ मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे.

तुरीवरील शेंग पोखरणारी अळी व शेंगमाशीचे वेळीच व्यवस्थापन करा

फुलोरा व शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत पिकाचे नियमित निरीक्षण करण्याचा सल्ला

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**यंदा एल निनोच्या प्रभावामुळे खरीप हंगामात मराठवाड्यातील अनेक भागांत अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला आहे. तथापि, संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या भागांत तुरीचे पीक चांगल्या अवस्थेत असून काही ठिकाणी कळ्या लागण्यास सुरुवात झाली आहे, तर काही क्षेत्रांत तुरळक फुलोरा दिसून येत आहे. आगामी काळात बहुतांश क्षेत्रावर तुरीचे पीक फुलोऱ्याच्या अवस्थेत येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर तुरीवरील शेंग पोखरणारी अळी (हेलिकोवर्पा) व शेंगमाशी या किडींचा संभाव्य प्रादुर्भाव लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी वेळीच व्यवस्थापन करावे, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे तज्ज्ञ डॉ. डी. डी. पटाईत, डॉ. जी. डी. गडदे व श्री. एम. बी. मांडगे यांनी केले आहे.

सध्या काही भागांत ढगाळ वातावरण असल्याने तुरीच्या पिकाचे नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे. शेंग पोखरणारी अळी कळ्या, फुले व शेंगांचे नुकसान करते. तर शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत शेंगमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे सुरुवातीच्या अवस्थेतच किडींची लक्षणे ओळखून नियंत्रणाचे उपाय योजावेत.

शेंग पोखरणाऱ्या अळीचे व्यवस्थापन : अळीच्या नियंत्रणासाठी पूर्ण वाढ झालेल्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात. प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी प्रति एकर दोन कामगंध (फेरोमोन) सापळे लावावेत. पक्ष्यांच्या मदतीने अळ्यांचे नियंत्रण होण्यासाठी प्रति एकर २० इंग्रजी 'टी' आकाराचे पक्षी थांबे उभारावेत. तसेच झाडाखाली पोते अंथरून झाडे हलवावीत व खाली पडलेल्या अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टिन घटक असलेल्या जैविक कीटकनाशकाची फवारणी करावी.

किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपर्यंत पोहोचल्यास इमामेक्टिन बेंझोएट ५ टक्के एसजी (४.४ ग्रॅम), स्पिनोसॅड ४५ टक्के एससी (३ मिली), इंडाक्झाकार्ब १४.५ टक्के एससी (८ मिली), क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी (३ मिली), फ्लुबेंडामाईड २० टक्के डब्ल्यूजी (५ ग्रॅम) किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल ९.३ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी (४ मिली) यापैकी कोणत्याही एका शिफारस केलेल्या कीटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात योग्य मात्रा मिसळून फवारणी करावी.

चाकूरमध्ये चंदन तस्करांवर पोलिसांची मोठी कारवाई; 11.70 लाखांचे 540 किलो चंदन जप्त

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतीनिधी

परभणी **लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर चंदनाचा अवैध साठा केल्याची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे विशेष पथकाने दि. ३ नोव्हेंबर रोजी आनंदवाडी येथे छापा टाकून ११ लाख ७० हजार रुपये किमतीचे तब्बल ५४० किलो प्रतिबंधित चंदन जप्त केले.चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे आनंदवाडी येथे चोपाळी-नायगाव रोडलगत असलेल्या शेतामध्ये ही कारवाई करण्यात आली. संबंधित शेतातील पाचटाच्या गंजीच्या पात्यांमध्ये चंदनाचे लाकूड लपवून ठेवण्यात आले होते. पोलिसांनी घटनास्थळाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात चंदनाचा साठा आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी ५४० किलो चंदन जप्त केले.

या प्रकरणी नरसिंग रामा बुडवंते (वय ५०, रा. आनंदवाडी), वसंत मानदास चानकण्णे (वय ४०, रा. वाढवणा), संतोष वेजनाथ चानकण्णे (वय ३५, रा. वाढवणा) आणि बालाजी मानदास चानकण्णे (वय ४२, रा. वाढवणा) यांच्याविरुद्ध चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५९४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच भारतीय वन अधिनियम कलम ४१ व ४२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस उपअधीक्षक पंकज झोले, संबंधित पोलीस अधिकारी आणि विशेष पथकातील कर्मचाऱ्यांनी केली. या यशस्वी कारवाईबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले.

दरम्यान, अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचवण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय, नांदेड परिक्षेत्राच्या वतीने 'खबर' हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील अवैध व्यवसायांची माहिती ९१ ५० १०० १०० या मोबाइल क्रमांकावर द्यावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

पत्रकारांचाही आमदार होणे ही काळाची गरज- सलीम इनामदार

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी **देशात व प्रत्येक राज्यात लोकशाही मार्गाने आन्दोलने होत असल्याने महाराष्ट्र राज्यात कोण कोणाला मारेल कोण कोणावर गोळी घालीन राज्यात कधी काय होईल गुन्हेगार टोळीला आळा बसेल का ?.कायदा व सुव्यवस्था एवढी का ढिशाळ होत आहे. राज्यकर्ते व पोलीस प्रशासनात समन्वय नाही का? शेतकऱ्यांचे ऊसाला भाव मिळावा या साठी आंदोलन, महागाई वाढीसाठी आंदोलन पेपर फुटी प्रकरण.

आज समाजात काय होत आहे. देशात व प्रत्येक राज्यात आंदोलन आंदोलने होत आहे तर पत्रकारांचे आमदार होणे ही काळाची गरज बनली आहे अशी प्रतिक्रिया समाजसेवक सलीम इनामदार यांनी एका प्रसिद्धी माध्यमा समोर व्यक्त केली.



राज्यतील प्रत्येक मतदार संघाचा आमदार.विधान परिषदेचा आमदार स्थानिक स्वराज्य संस्थेचा आमदार शिक्षक मतदार संघाचा आमदार पदवीधर मतदारसंघाचा आमदार राज्यपाल नियुक्त आमदार तर पत्रकारांचा पण आमदार होणे ही काळाची गरज ओळखून आमदार नियुक्त करावा अशी मागणी वृतपत्रा द्वारे प्रसार माध्यमाकडे सामाजिक क्षेत्रात काम करणारे समाज सेवक सलीम इनामदार यांनी केली आहे.

आज समाजात फक्त आणि फक्त पैशाच्या जोरावर कोणी पण काही पण करत आहे लक्षात ठेवा दिवस येता जाता पैशाचा माज आलेल्या बुद्धी जीवाला यापासून धडा शिकला पाहिजे काय हो विधान सभा असो विधान परिषद, लोकसभा, जिल्हापरिषद, महानगर पालीका, नगरपालीका, पचांयत समीती, ग्राम पंचायत, जिल्हा मध्यवर्ती बँक, राज्यातील साखर कारखाने, जिल्हा मजूर फेडरेशन, कामगार युनियन, विविध पतपेढ्या बुद्धीजीवी, पदवीधर मतदारसंघ काय पदवीधरांसाठी काय समाजासाठी काय फक्त आणि फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी पदवीधर विकले जात आहेत. प्रत्येक निवडणुकीत मतदार हा खरेदी विक्रीचा धंदा झालेला आहे. मतदार हा कशासाठी विकला गेला याचे मुळ कारण शोधले पाहिजेत अशी खंत ही सलीम इनामदार यांनी व्यक्त केली.

मतदारांची पत्रकाराला कोणी समाजात स्थान देत नाही, जे देतात ते स्वार्थापोटी आणि म्हणतात आम्ही तुमच्या सोबत आहोत त्यासाठी पत्रकारांचा पण आमदार असला पाहिजे. आमदार पदाच्या मंजुरीसाठी जूट होणे काळाची गरज आहे. परभणी मध्ये जो जिल्हाधिकारी येतो तो जिल्हाधिकारी निवृत्त होण्याच्या कालावधीपर्यंतच येतो असं का होते. परभणी जिल्ह्याची लीडरशिपची कमतरता आहे का? असा प्रश्न जनतेला व जाणकारांना पडलेला आहे. कृषी विद्यापीठात टेंडरच्या नावे झालेला घोटाळा, जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेला घोटाळा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन मंजुरीसाठी घेण्यात आलेला पैसा. अनेक संस्थांच्या नावाने वाटलेला पैसा, जिल्हा मध्यवर्ती बँकेत नोकरीच्या नावाने घेण्यात आलेले करोडो रुपयांची डोनेशन असे काही प्रकार घडलेले आहेत.गौण खनिजाचे काय चालू आहे यावर काय उपाय आहे का किती (ठेकेदारला) कॉन्ट्रॅक्टरला गौण खनिज मध्ये दंड केला, गौण खनिजाची किती रॉयल्टी मागील जिल्हाधिकारी व महसूल विभागाने वसूल केली, वाळू माफिया किती माज केले त्यावर काय शासनाने केलं ? स्वस्त धान्य दुकानदाराने काय काय केलं यावर कोणाचं लक्ष आहे का? परभणी जिल्ह्यात गुटका विक्रीच्या धुमाकूळ, पोलीस प्रशासन व अन्न औषध प्रशासन गप्प का प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्रास गुटखा विक्री तंबाखूजन्य पदार्थावर शासन बंदी असताना सर्वोच्च न्यायालयाची बंदी असताना न्यायालयाच्या आदेशाची सर्रासपणे परभणी जिल्ह्यात पायमल्ली होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

मंत्रिमंडळाचे 12 मोठे निर्णय; विद्यार्थी, वाहनधारक आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा



मुंबई : महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध विभागांशी संबंधित १२ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यात विद्यार्थी, वाहनधारक, आणि शेतकऱ्यांचा समावेश आहे. तसेच पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ, वाहनांच्या प्रलंबित दंडासाठी अभय योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ, न्यायालयांची स्थापना आणि कृषी क्षेत्रासाठी आंतरराष्ट्रीय सुविधा केंद्र अशा विविध निर्णयांचा यात समावेश आहे. या निर्णयांमुळे विद्यार्थी, वाहनधारक, शेतकरी, सहकारी संस्था आणि नागरिकांना दिलासा मिळण्याची मोठी अपेक्षा आहे.

मंत्रिमंडळातील १२ महत्त्वाचे निर्णय

1. पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील पशुचिकित्सालयांमध्ये सेवा देण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळणार असून, पशुधनाची काळजी घेण्यासह शेतकरी आणि पशुपालकांना मदत होणार आहे.

2. वाहनधारकांसाठी दंड अभय योजना-२०२६

वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे वाहनांवर आकारण्यात आलेल्या प्रलंबित दंडाच्या रकमेत एकवेळची सवलत देण्यासाठी महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलन अभय योजना-२०२६ राबविण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत थकीत दंडाच्या रकमेवर २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे वाहनधारकांना थकबाकी भरून दंडातून मुक्त होण्याची संधी मिळणार आहे.

3. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात वाढ

विमुक्त जाती, इतर मागास प्रवर्ग (OBC), भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, हा महत्वाचा निर्णय आज घेण्यात आला. विभागस्तरीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा १,५०० रुपये, तर जिल्हास्तरावरील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा १,३०० रुपये निर्वाह भत्ता मिळणार आहे.

4. पालघर जिल्ह्यात तीन ग्राम न्यायालयांची स्थापना

पालघर जिल्ह्यातील तलासरी, मोखाडा आणि विक्रमगड येथे ग्राम न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रत्येक न्यायालयासाठी पाच याप्रमाणे एकूण १५ अनुषंगिक पदे मंजूर करण्यात आली आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक स्तरावर न्याय मिळविण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. विधी व न्याय विभागामार्फत हा निर्णय घेण्यात आला आहे.

5. मुखेड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे नियमित न्यायालय स्थापन करण्यास नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे मंजुरी देण्यात आली आहे. याआधी मंजूर करण्यात आलेल्या जोड न्यायालयाऐवजी नियमित न्यायालय सुरू करण्यात येणार आहे. न्यायालयासाठी आवश्यक पदे आणि खर्चाच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली आहे.

6. नागपूर जिल्ह्यातील नगर पंचायतीला जमीन

नागपूर जिल्ह्यातील बिडगाव, तरोडी (खुर्द) आणि पांढुर्णा (ता. कामठी) नगर पंचायतीला प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी १ हेक्टर ८६ आर जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नगर पंचायतीच्या प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक सुविधा उभारण्यास मदत होणार आहे.

7. गोंदियातील घरांसाठी दिलेल्या जमिनींचे वर्ग-१ मध्ये विनामूल्य रूपांतरण

गोंदिया शहरात लिलावाद्वारे किंवा भाडेतत्त्वावर घरांसाठी वितरित करण्यात आलेल्या जमिनींचे विनामूल्य वर्ग-१ मध्ये रूपांतरण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे संबंधित जमीनधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

8. सिद्धिविनायक मंदिर न्यासाला मुद्रांक शुल्क माफी

श्रीमंत देवस्थानांपैकी एक असलेलं मुंबईतील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाने खरेदी केलेल्या राम मेन्शन इमारतीच्या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मंदिर परिसराच्या विकासासाठी आणि भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे कुलगुरूंसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले स्वागत



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६७ व्या वार्षिक दीक्षांत समारंभासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांचे बुधवारी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झाले. यावेळी पोलीस दलाच्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली.

विमानतळावर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांनी राज्यपालांचे स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रवीण वक्ते, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस आयुक्त प्रवीण पवार आणि पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरची विजयी सुरुवात

19 वर्षांखालील मुला-मुलींच्या फॉइल प्रकारात प्रथम; सेबरमध्ये द्वितीय क्रमांक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेचा शुभारंभ महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ आणि मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते झाला. या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाने विजयी सुरुवात करत १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या फॉइल प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.

३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान विभागीय क्रीडा संकुलात या स्पर्धा होत आहेत. राज्यातील आठ विभागांतील सुमारे ५०० खेळाडूंसह प्रशिक्षक, व्यवस्थापक, तांत्रिक समितीचे सदस्य, अधिकारी, पंच आणि स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या विविध गटांत तलवारबाजीच्या चुरशीच्या लढती रंगत आहेत.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी १९ वर्षांखालील मुलांच्या फॉइल प्रकारात छत्रपती संभाजीनगरने प्रथम, अमरावतीने द्वितीय, नागपूरने तृतीय, तर लातूरने चौथा क्रमांक मिळविला. इप्पी प्रकारात लातूर प्रथम, पुणे द्वितीय, कोल्हापूर तृतीय, तर छत्रपती संभाजीनगर चौथ्या क्रमांकावर राहिले. सेबर प्रकारात नागपूरने



प्रथम, छत्रपती संभाजीनगरने द्वितीय, कोल्हापूरने तृतीय, तर पुण्याने चौथा क्रमांक पटकावला.

१९ वर्षांखालील मुलींच्या फॉइल प्रकारात छत्रपती संभाजीनगरने प्रथम, पुणे द्वितीय, नागपूर तृतीय, तर नाशिकने चौथा क्रमांक मिळविला. इप्पी प्रकारात नागपूर प्रथम, कोल्हापूर द्वितीय, मुंबई तृतीय, तर पुणे चौथ्या क्रमांकावर राहिले. सेबर प्रकारात पुणे प्रथम, छत्रपती संभाजीनगर द्वितीय, नाशिक तृतीय, तर नागपूरने चौथा क्रमांक मिळविला.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपसंचालक शेखर पाटील, क्रीडा विभाग प्रमुख विजय पाटील, महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे सचिव डॉ. उदय डोंगरे, प्रकाश कटुळे, राजू शिंदे, दुधाने, डॉ. दिनेश वंजारे, जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर, महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी संजीव बाल्लया, कार्यक्रमाधिकारी ज्ञानदेव सांगळे, मनपा क्रीडा समन्वयक सागर मगरे, स्पर्धा प्रमुख मार्गदर्शक तुषार आहेर आणि शिल्पा नेने आदी उपस्थित होते.

सामन्यांसाठी राहुल पडवळ, जयदीप पांढरे, विशाल दानवे, सौरभ तोमर, पेरिया स्वामी, महेश कोरडे आणि विश्वजीत कुलकर्णी यांनी पंच म्हणून काम पाहिले.

तलवारबाजी या ऑलिम्पिक खेळाला प्रोत्साहन देणे, ग्रामीण व शहरी भागांतील गुणवंत खेळाडूंना राज्यस्तरावर कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना देणे हा स्पर्धेच्या आयोजनामागील उद्देश आहे. या स्पर्धेमुळे राज्यभरातील उदयोन्मुख खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

गंगाखेड नगरपरिषदेतील भंगार साहित्य व घंटागाड्यांच्या विक्रीची चौकशी करा; भीम आर्मीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतीनिधी



परभणी : गंगाखेड नगरपरिषदेच्या प्रशासकीय काळात पाणीपुरवठा विभागातील जुने लोखंडी पाइप, फिटिंग साहित्य, विविध उपकरणे व इतर भंगार साहित्य तसेच स्वच्छता विभागातील अवजड सात घंटागाड्यांची विक्री करण्यात आल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भीम आर्मी भारत एकता मिशनच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, परभणी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, सन २०२३ ते २०२५ या कालावधीत गंगाखेड नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील जुने लोखंडी पाइप, फिटिंग साहित्य, विविध उपकरणे व इतर भंगार साहित्य तसेच स्वच्छता विभागातील अवजड सात घंटागाड्यांची विक्री करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मात्र, सदर साहित्य व घंटागाड्यांची विक्री कोणत्या नियमांनुसार करण्यात आली, याबाबत संघटनेने प्रश्न उपस्थित केले आहेत. या विक्रीसाठी नगरपरिषदेने अधिकृत जाहिरात प्रसिद्ध केली होती का? लिलाव प्रक्रिया राबविण्यात आली होती का? विक्रीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी घेण्यात आली होती का? तसेच विक्रीतून प्राप्त झालेली रक्कम नगरपरिषदेच्या अधिकृत खात्यात जमा करण्यात आली आहे का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणात शासकीय मालमत्तेची विल्हेवाट नियमानुसार लावण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत पारदर्शक चौकशी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. संबंधित कागदपत्रांची तपासणी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भीम आर्मी भारत एकता मिशनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911